ठाणे महानगरपालिका, ठाणे.

वृक्षप्राधिकरण

जाहीर सुचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम २००९ व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १५५/२०१३ व जनहित याचिका क्र. ९३/२००९ मधील दिलेले आदेशानुसार मा. वृक्षप्राधिकरणावर कमाल सहा नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यासाठी खालील पात्रताधारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. अर्जदाराची कृषी/वन/उद्यान विद्या शास्त्राची पदवी किंवा पदविका असणाऱ्यांना प्राधान्य.
२. वृक्षप्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रीय सदस्य असणे आवश्यक.
३. वृक्षांचे रोपण जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन, क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव.
४. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनांना प्राधान्य
५. नामनिर्देशित सदस्य, स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा.

तरी, उपरोक्त पात्रता असणाऱ्या प्रतिनिधींनी संपूर्ण माहितीसह भरलेले अर्ज व त्यासह अर्जदार यांनी सादर करण्यात येणारे कागदपत्र हे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले असणे बंधनकारक असून सदर कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह बंद लिफाफा मध्ये नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, महापालिका भवन, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे (प.) ४००६०२ येथे कार्यालयीन वेळेत सदरची सुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत सादर करण्यात यावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. सदरची सुचना ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त,<br>
अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण,<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.